# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.09.2025** **वारःमंगळवार**

---

1. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत या वर्षात 25 लाख अतिरिक्त एलपीजी गॅस सिलेंडर देण्याचा सरकारचा निर्णय
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज 71वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करणार
3. दहाव्या राष्ट्रीय आयुर्वेद दिवसानिमित्त देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन आणि
4. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भगत येत्या 30 तारखेपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज

**गॅस जोडणी**

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवसाची भेट म्हणून केंद्र सरकार प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत 25 लाख अतिरिक्त एलपीजी गॅस सिलेंडर जोडणी देणार आहे. या आर्थिक वर्षात लाभार्थींना मिळणारी ही भेट महिला सक्षमीकरणाच्या प्रयत्नाला अधिक मजबूत करेल. असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. यामुळे 10 कोटी 60 लाख पर्यंत लाभार्थ्यांची संख्या होणार आहे. असं पेट्रोलिअम मंत्री हरदिप सिंग पुरी यांनी सांगितलं. 2016 मध्ये सुरू झालेल्या उज्ज्वला योजनेत यापुर्वी 10 कोटी 30 लाख गॅस सिलेंडर जोडणी देण्यात आली आहे.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्यू समुदायाला आणि इस्रायलच्या लोकांना ज्यू नववर्षाच्या, अर्था रोश हशनाहच्या शुभेच्छा दिल्या आहेत. नवीन वर्ष प्रत्येकाच्या जीवनात शांती, आशा आणि चांगले आरोग्य घेऊन येवो असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**राष्ट्रपती-पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत 71वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करणार आहेत. मल्याळी चित्रपट अभिनेता मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार शाहरुख खान यांना जवान या चित्रपटासाठी तर विक्रम मेस्सी यांना 12वी फेल या चित्रपटासाठी तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार राणी मुखर्जी यांना मिसेज चटर्जी वर्सेस नॉर्वे या चित्रपटासाठी प्रदान करण्यात येईल. सर्वश्रेष्ठ चित्रपटाचा पुरस्कार 12वीं फेल या चित्रपटाला दिला जाईल.

**अमित शहा**

गुजरातमधील गांधीनगर इथं महात्मा मंदिरांत स्टार्टअप परिषदेचं गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज उद्घाटन होणार आहे. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल आणि तंत्रशिक्षणमंत्री ऋषीकेश पटेल यावेळी उपस्थित असतील. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत एक हजारांहून अधिक स्टार्टअप्स, 5 हजार नवउद्यमी आणि 100 औद्योगिक सल्लागार, 50 हून अधिक आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत.

**आयुर्वेद दिन**

दहावा राष्ट्रीय आयुर्वेद दिवस आज साजरा करण्यात येत आहे. 'आयुर्वेद प्रत्येक मानवासाठी; आयुर्वेद पृथ्वीसाठी' अशी यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना आहे. विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. गोव्यातील अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेत आज 10 वा राष्ट्रीय आयुर्वेद दिवसानिमित्त मुख्य कार्यक्रम होणार आहे, या कार्यक्रमाचं उद्घाटन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी आयुर्वेद क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राष्ट्रीय धन्वंतरी आयुर्वेद पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे.

**<u>जीएसटी-वैष्णव</u>**

वस्तू आणि सेवा कराच्या दुसऱ्या टप्प्यातल्या सुधारणा कालपासून लागू झाल्या. जीएसटी सुधारणांमुळे जीडीपीमध्ये सुमारे 20 लाख कोटी रुपयांची वाढ होईल, असा विश्वास माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. या सुधारणांमुळे व्यापाऱ्यांपासून ते सामान्य नोकरदारांपर्यंत सर्वजण सुखावतील, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>जीएसटी प्रतिक्रिया - अहिल्यानगर</u>**

नवरात्रीच्या पहिल्या दिवसापासून काल वस्तु आणि सेवा कराचे सुधारित दर देशभरात लागू झाले. दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील जीएसटी दर कमी केल्याचा थेट लाभ ग्राहकांना मिळण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे घरगुती खर्चाबरोबरच शालेय वस्तूंच्या खरेदीत फायदा होणार आहे. या अनुषंगाने अहिल्यानगर मधील अतुल देशपांडे आकाशवाणीशी बोलताना म्हणाले....

**माझा छोटा मुलगा तिसरीला आहे आणि एक मुलगी सहावीला आता आहे. जीएसटी कमी झाल्यामुळे शैक्षणिक साहित्य जे आहे त्यावरचा मोठ्या प्रमाणात खर्च कमी होईल. त्याच्या किमती कमी होतील. त्याच्या उत्पन्नातून अधिक चांगलं साहित्य, अधिक चांगलं शिक्षण मुलांना मुलींना देता येईल. त्यामुळं जीएसटी कमी झाल्याचं आम्ही स्वागत करतो. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांचेही आम्ही आभार मानतो.**

**<u>ट्रंप</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आज संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या 80 व्या सत्राला संबोधित करणार आहेत. दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतरच्या पहिल्या आठ महिन्यात केलेल्या कामगिरीचा आढावा ते घेणार असल्याचं व्हाईट हाऊसच्या माध्यम प्रवक्त्या कॅरोलीन लेव्हिट यांनी मध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>जयशंकर-रुबिओ भेट</u>**

संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेसाठी परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर काल अमेरिकेत न्यूयॉर्कमध्ये पोहोचले. यावेळी त्यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ आणि अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्गिओ गोर यांची भेट घेऊन चर्चा केली. जयशंकर आणि मार्को रुबिओ यांच्यात भारत आणि अमेरिके दरम्यानच्या सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीवर तसंच आंतरराष्ट्रीय मुद्यांवर विस्तृत चर्चा झाली.

**<u>सिरीया अध्यक्ष</u>**

सिरियाचे अध्यक्ष अहमद-अल-शरा, संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या 80 व्या सत्राला संबोधित करणार आहेत. सिरियाच्या 60 वर्षांच्या इतिहासात असं भाषण करणार ते पहिलेच अध्यक्ष आहेत. या वर्षीच्या मे महिन्यात सिरियाचे अध्यक्ष आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यात झालेल्या बैठकीनंतरची ही फलश्रुति मानली जात आहे. या बैठकीनंतर सिरिया वरील अनेक निर्बंध हटवण्यात आले.

**<u>पाकिस्तान-एनओए-मंजुषा</u>**

पाकिस्तानी हवाई दलानं काल काल खैबरपखतुनख्वा भागात काल केलेल्या हवाई हल्ल्यात महिला आणि बालकांसह 30 नागरिकांचा मृत्यू झाला. काल पहाटे 2 वाजाताच्या सुमारास तिराह खोऱ्यात जेएफ 17 या लढाऊ विमानाने बॉम्बचा वर्षाव केला. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनांनी या आरोपांची चौकशी करण्याचे आवाहन केलं आहे, नागरिकांचे संरक्षण आणि मानवाधिकारांच्या उल्लंघनासाठी जबाबदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पाकिस्तानी लष्कर आणि सरकार या घटनेवर मौन बाळगून आहेत.

**<u>छत्तीसगढ</u>**

केंद्र सरकारने नॅशनल सोशालिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड अर्थात खापलांग या संघटनेशी संबंधित शाखा तसंच गटावर बेकायदेशीर संघटना म्हणून पाच वर्षांसाठी बंदी घातली आहे. या बंदीची मुदत या महिन्याच्या 28 तारखेपासून लागू होईल. ही संघटना भारताच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला बाधा पोहोचवणाऱ्या कारवायांमध्ये सहभागी असल्याचं गृह मंत्रालयाने एका राजपत्र अधिसूचनेत म्हटलं आहे.

**नक्षल-ठार**

छत्तीसगडमध्ये, नारायणपूर जिल्ह्यात काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. दोघांवरही प्रत्येकी चाळीस लाख रुपयांचे बक्षीस होते. सुरक्षा दलांनी माओवाद्यांविरोधात केलेली ही कारवाई हा मोठा विजय असल्याचं गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

**नवरात्र**

अश्विन शुद्ध प्रतिपदेच्या मुहूर्तावर काल देशभरात शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. महाराष्ट्रात घरोघरी घट बसून नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा केली जात आहे. या शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्य सरकारनं यावर्षी प्रथमच 'राज्य पर्यटन महोत्सवाचा' दर्जा दिल्यामुळं नऊ दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. कोल्हापूर, तुळजापूर, माहूर आणि वणी या महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांच्या ठिकाणी शारदीय नवरात्राला उत्साहानं प्रारंभ झाला आहे. तुळजापुरात तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपल्यानंतर विधिवत घटस्थापना करण्यात आली. कोल्हापूरच्या महालक्ष्मी अंबाबाई मंदिरात घटस्थापनेनं उत्सवाला प्रारंभ झाला अंबाबाईची श्रीकमलालक्ष्मी रुपात पूजा बांधण्यात आली होती. नाशिकच्या वणी इथल्या श्री सप्तश्रृंगी देवी मंदिरामध्ये दागिन्यांची पूजा करून मिरवणूक काढण्यात आली त्यानंतर महापूजा करून घटस्थापना करण्यात आली.

**दिव्या देशमुख**

फिडे विश्वविजेती महिला बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर दिव्या देशमुख हिला आगामी फिडे विश्वचषक स्पर्धेसाठी वाइल्ड कार्ड एंट्री देण्यात आली आहे. या स्पर्धेत भारतातील 21 खेळाडू सहभागी होणार असून भारतीय पथकाचं नेतृत्व जागतिक विजेता डी. गुकेश करणार आहे. येत्या 31 ऑक्टोबर पासून गोव्यात ही स्पर्धा सुरू होणार आहे.

**फुटबॉल**

कोलंबो इथं सुरु असलेल्या 17 वर्षांखालील सॅफ फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघानं उपांत्य फेरीत धडक मारली आहे. पाकिस्तानविरुध्द काल झालेल्या सामन्यात भारतानं 3-2 असा विजय मिळवला.

**वादळ**

फिलीपिन्समधील पानुइटान बेटावर सुपर टायफून रागासा हे वादळ धडकलं आहे. ताशी 230 किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वारे वाहत आहेत अशी माहिती फिलीपिन्सच्या हवामानशास्त्र संस्थेनं दिली हे वादळ पश्चिमेकडे दक्षिण चीनकडे जाण्याची शक्यता आहे.

**हवामान**

बंगालच्या उपसागरावर उद्या 24 तारखेला कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून 28 तारखेपर्यंत त्याचा प्रभाव महाराष्ट्रात पडण्याची शक्यता आहे. परिणामी किमान 30 सप्टेंबरपर्यंत राज्यभरात पावसाचा जोर राहण्याचा अंदाज आहे. ओडिशातील काही भागातही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. छत्तीसगड, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगालचा काही भाग, झारखंड, आणि ईशान्येकडील राज्यांमध्येही मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं